**ठळक बातम्या**

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबतच्या विधानावरुन गदारोळ झाल्याने आज संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब

- राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आज भारत-चीन विशेष प्रतिनिधींच्या चर्चेत सहभागी होणार

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतीपदासाठी महायुतीचे उमेदवार राम शिंदे यांचा अर्ज दाखल

- बॉर्डर - गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला ब्रिस्बेन इथं झालेला तिसरा कसोटी सामना अनिर्णित

**आणि**

- भारताचा अष्टपैलू क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबतच्या विधानावरुन गदारोळ झाल्याने आज संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल राज्यसभेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याचा आरोप करत लोकसभेत विरोधी पक्ष सदस्यांनी आज प्रचंड गदारोळ केला. सभागृहाचं कामकाज सुरु झाल्यावर लगेचच काँग्रेस, द्रमुक आणि डाव्या पक्षाच्या सदस्यांनी

शहा यांचा निषेध करणाऱ्या घोषणा द्यायला सुरुवात केली. संसदीय कार्य राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल आणि सत्ताधारी सदस्यांनी त्याला हरकत घेतली. उलट काँग्रेसनेच कायम बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान केला असा आरोप मेघवाल यांनी केला. केवळ राजनैतिक गरज म्हणून काँग्रेसला डॉ. आंबेडकरांबद्दल आदर व्यक्त करावा लागला असं ते म्हणाले. दोन्ही बाजूंनी घोषणा सुरु राहिल्याने सभापती ओम बिरला यांनी दोन वाजेपर्यंत कामकाज स्थगित केलं.

राज्यसभेतही काँग्रेस, द्रमुक, राजद, आमआदमी पार्टी आणि इतर विरोधी सदस्यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या विधानाचा निषेध करणाऱ्या घोषणा दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांसाठीच अतिशय आदरणीय आहेत असं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सांगितलं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की काल अमित शहा डॉ. आंबेडकरांबाबत अतीव आदरानेच

बोलले होते. मात्र काँग्रेसने डॉ आंबेडकरांच्या हयातीत आणि नंतरही त्यांची अवहेलना केली, लोकसभा निवडणुकीत त्यांना पराभूत करण्याचं कारस्थान केलं असा आरोप त्यांनी केला. काँग्रेसने केवळ मतपेढीच्या राजकारणासाठी बाबासाहेबांच्या नावाचा वापर केला असं ते म्हणाले. गदारोळ चालूच राहिल्याने अध्यक्ष जगदीप धनखड यांनी दुपारी २ वाजेपर्यंत कामकाज स्थगित केलं.

**<><><><><>**

भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आज बीजिंगमध्ये होणाऱ्या भारत-चीन विशेष प्रतिनिधींच्या चर्चेत सहभागी होतील. पूर्व लडाखमध्ये लष्करी हस्तक्षेपामुळे चार वर्षांपासून रखडलेले द्वीपक्षीय संबंध पुनरूज्जीवित करण्याच्या उद्देशानं ही चर्चा होणार आहे. अजित डोवाल त्यांचे चीनचे समकक्ष आणि परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्यातल्या चर्चेची ही २३ वी फेरी आहे. उभय देशांत पूर्व

लडाखमध्ये झालेल्या करारानंतर, द्वीपक्षीय संबंधांसह इतरही अनेक मुद्द्यांवर चर्चा होईल अशी अपेक्षा आहे. चीन प्रामाणिकपणे मतभेद सोडवण्यासाठी तयार असल्याचं चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी वार्ताहरांशी बोलताना स्पष्ट केलं.

<><><><><>

गुंतवणूक सल्ला देऊ इच्छिणारी कोणतीही व्यक्ती आयए रेग्युलेशन अर्थात गुंतवणूक सल्लागार नियमावली अंतर्गत पात्र आणि नोंदणीकृत असणं आवश्यक आहे, असं सेबीनं काल प्रकाशित केलेल्या प्रस्तावित नियम सुधारणा पत्रकात म्हटलं आहे. गुंतवणूकदारांच्या माहितीची सुरक्षितता, दिलेल्या सल्ल्याची अचूकता याबाबतची जबाबदारी ही गुंतवणूक सल्लागाराची असते,मात्र सध्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून गुंतवणूक सल्ला दिला जात आहे. गुंतवणूक सल्ल्याच्या व्याख्येत करण्यात आलेले महत्त्वाचे बदल, एखाद्या व्यक्तीची गुंतवणूक सल्लागार होण्यासाठीची पात्रता आणि वेबसाइटच्या देखभालीसंबंधीचे नियम प्रस्तावित दुरुस्तीमध्ये लागू करण्यात आले आहेत.

<><><><><>

देशाच्या एकात्मतेचा आणि सांस्कृतिक इतिहासाचा महत्त्वाचा आधार देशाच्या भाषा आहेत, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी यांनी आज नवी दिल्ली इथं बातमीदारांशी बोलताना केलं. भारतात १२१ प्रमुख भाषा आणि जवळपास सोळाशे बोलीभाषा आहेत. भाषा हे केवळ संवादाचं माध्यम नसून ज्ञान, संस्कृती आणि परंपरांचा महत्त्वाचा वारसा आहे. केंद्रीय मंत्रिमंडळानं या वर्षी ऑक्टोबरमध्ये मराठी, पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला असून ११ भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देणारा भारत हा एकमेव देश आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

नागपूर इथं सुरू असलेल्या महाराष्ट्र विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात उद्या विधान परिषदेच्या सभापती पदासाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी महायुतीच्या वतीनं आज प्रा. राम शिंदे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, उदय सामंत आणि जयकुमार रावल हे मान्यवर नेतेही उपस्थित होते. महाविकास आघाडीनं मात्र अद्याप कोणत्याही उमेदवाराच्या नावाची घोषणा केलेली नाही.

**<><><><><>**

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या तिसऱ्या दिवशी विधानसभेचं कामकाज सुरू झाल्यावर औचित्याचे मुद्दे चर्चेसाठी घेण्यात आले. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल राज्यसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या वक्तव्याचा मुद्दा आज विधानसभेत काँग्रेसचे नितिन राऊत यांनी उपस्थित केला. मंत्री आशीष शेलार यांनी त्याला हरकत घेऊन राज्यसभेतले विषय या सभागृहात घेता येणार नाही, असं सांगितलं.

मुंबईत झालेल्या विशेष अधिवेशनात राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबाबतची चर्चा विधानपरिषदेत पुढे सुरू झाली. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या राज्यसभेतल्या वक्तव्याचा मुद्दा विधानपरिषदेत उपस्थित करण्याचा प्रयत्न केला, मात्र उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यासह सत्ताधारी सदस्यांनी यावर आक्षेप घेतला. यावर विरोधकांनी घोषणाबाजी करत सभात्याग केला. दरम्यान, विधानपरिषदेत आज विविध विधेयकं संमत करण्यात आली.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करून विरोधकांनी आज विधानभवन परिसरात निदर्शनं केली.

**<><><><><>**

दहाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ते आज पाचव्या स्थानापर्यंतचा भारताचा प्रवास जागतिक आणि देशांतर्गत आव्हानांच्या टप्प्यात अविश्वसनीयपणे वेगवान वाढीचा आहे, असं मत नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन के. बेरी यांनी व्यक्त केलं आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. नीती आयोग, कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले आणि इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय 'भारताच्या बहुविध संक्रमणांवर आंतरराष्ट्रीय कार्यशाळेबद्दल त्यांनी माहिती दिली.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर - गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला ब्रिस्बेन इथं झालेला तिसरा कसोटी सामना अनिर्णित राहिला.

आज सामन्याच्या अखेरच्या दिवशी भारताचा पहिला डाव कालच्या धावसंख्येत ८ धावांची भर घालून २६० धावांवर आटोपला. त्यानंतर ऑस्ट्रेलियानं दुसऱ्या डावात वेगानं धावा करत ७ बाद ८९ धावा झाल्या असताना डाव घोषित केला, आणि पहिल्या डावातल्या १८५ धावांच्या आघाडीसह भारतासमोर विजयासाठी २७५ धावांचं आव्हान ठेवलं.

मात्र भारताच्या दुसऱ्या डावात केवळ २ षटकं आणि १ चेंडूचा खेळ झाल्यावर पंचांनी अपूऱ्या प्रकाशामुळे खेळ थांबवला. त्यानंतर पावसानं हजेरी लावल्यानं खेळ पुन्हा सुरू होऊ शकला नाही. अखेरीस सामना अनिर्णित राहिल्याचं घोषित केलं गेलं.

ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावातला दीड शतकवीर ट्रॅव्हिस हेड याला सामनावीराच्या किताबानं गौरवलं गेलं.

या मालिकेतला चौथा सामना, येत्या २६ डिसेंबरपासून मेलबर्न इथं सुरू होणार आहे. आत्तापर्यंत झालेल्या तीन सामन्यांमध्ये दोन्ही संघांनी प्रत्येकी एका सामन्यात विजय मिळवल्यानं, मालिका १-१ अशी बरोबरीत आहे.

**<><><><><>**

भारताचा अष्टपैलू क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विन यानं आज ३८व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली. ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा कसोटी सामना अनिर्णित राहिल्यानंतर त्यानं आपण निवृत्त होत असल्याचं जाहीर केलं. या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात अश्विननं भारताचं प्रतिनिधीत्व केलं होतं. या सामन्यात त्यानं ५३ धावांत १ गडी बाद केला. हाच त्याच्या कारकिर्दीतला अखेरचा कसोटी क्रिकेट सामना ठरला.

**//<><><><><>//**